# प्रकरण

(1 ले.)

## पूर्वाभ्यासाचे स्वरूप.

# * प्र क र ण – 1 ले *

## पूर्वाभ्यासाचे स्वरुप

### 1. संत साहित्यात समर्थ रामदासांचे वेगळे स्थान :

महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले. त्यांचे कवित्व प्रामुख्याने परमार्थपर आहे. रामदास हे एक असे संत होऊन गेले की, ज्यांनी परमार्थाच्या उपदेशाबरोबरच प्रपंचात कसे वागावे हा सुद्धा उपदेश केला आहे. मराठी संतांमध्ये समर्थ रामदासांचे वेगळेपण स्पष्ट दिसून येते. इतर सर्व संतांप्रमाणे त्यांनी परमार्थाचा उपदेश तर केलाच पण प्रवृत्ति-मार्गाचा उपदेश करुन मरगळलेल्या समाजात नवचैतन्य निर्माण केले. 'आधी प्रपंच करावा नेटका' म्हणून त्यांनी प्रपंचविज्ञान सांगितले. हरिकथानिरुपणाबरोबरच राजकारण, सर्व विषयांत सावधपण, व्यवहारचातुर्य इत्यांदीचा उपदेश करुन त्यांनी समाजात प्राण ओतला. रामदास आणि तुकाराम हे जरी एकाच काळातील संत असले तरी रामदासांचे वाड्.मय तुकारामांच्या अभंगापेक्षा आंतर्बाह्य वेगळे आहे. इतर संतांनी समाजाचे चौफेर निरीक्षण करुन त्यातून आत्मनिरीक्षणाचा मार्ग पत्करला. रामदासांच्या समाजचिंतन आणि आत्मचिंतन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ज्ञानेश्वरांनी अठरापगड जातींच्या संतांबरोबर तीर्थयात्रा केली. ती एका ध्येयवेडया भूमिकेतून. परंतु रामदासांचे भारतभ्रमण अवलोकन, सूक्ष्म निरीक्षण, चिंतन या भूमिकेतून झाले आहे.

हरिकथानिरुपण, राजकारण, सावधपण आणि साक्षेप ही रामदासांची चतु:सूत्री आहे.[9] समर्थांनी जे हरिकथा निरुपण केले, ते सुद्धा इतर संतांहून वेगळया प्रकारे केले. ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत जे संतवाड्.मय निर्माण झाले त्या सा–या वाड्.मयात तत्कालीन सामाजिक आणि धार्मि परिस्थितीचा निश्चित प्रभाव पडलेला दिसून येतो. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी अध्यात्मिक विचारांच्या संदर्भात मानवी जीवनाची जी व्यर्थता प्रगट केली तीच जीवनाची व्यर्थता सोळाव्या शतकांत संत एकनाथांनी तीव्रपणे आणि उत्कटपणे प्रगट केली. संत तुकारामांच्या अभंगामध्ये हीच संसाराची व्यर्थता ठाई ठाई प्रगट झाली आहे. या सर्व संतांनी जीवनाची एकांगी बाजूच प्रभावीपणे मांडली. या निरर्थक जीवनातून सुटका करुन घेण्याचा 'जीवनाविषयी उदासिनता पत्करुन निवृत्तिधर्माचा स्वीकार करणे' हा एकच मार्ग सांगितला. मानवी जीवनाला काही अर्थ नाही. संसारातील मायामोहात अडकून पडण्यापेक्षा परमेश्वराची भक्ती वैराग्यवृत्तीने केल्याने परमेश्वराची प्राप्ती होते. परमार्थ हाच एकमेव आधार आहे असे त्यांनी सांगितले. रामदासांनी मात्र प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीचा समतोल राखला

परमार्थ करु पाहिजे. प्रपंचाचा त्याग करुन नका असे त्यांचे म्हणणे आहे.

'आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।।

येथे आळस करु नका । विवेकी हो ।।'

प्रपंच नीटपणे न केल्याने प्रपंचात अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मन विचलीत होते. आणि मनाला पूर्णपणे खंबीरपणा आलेला नसल्यामुळे धड परमार्थ साधन्ही होत नाही, आणि धड प्रपंचपण होत नाही. प्रपंच आणि परमार्थ यामध्ये तडजोड करुन परमार्थ कसा करावा याचा उपदेश समर्थांनी दासबोधात केलेला आहे. प्रपंच आणि परमार्थ यांत नसता भेद कल्पून प्रपंचाची होणारी हेळसांड रामदासांना मान्य नव्हती. प्रपंचधिचे आणि व्यवहार धर्माचे त्यांनी इतक्या सूक्ष्मपणे व साकल्याने स्पष्टीकरण केले आहे. तसे इतर संतांनी अभावाने केले आहे.

दासबोधांच्या पहिल्या दशकात रामदासांनी 'सभास्तवन' आणि 'नरदेहस्तवन' असे दोन वेगळे समास लिहले आहेत. 'सभास्तवनांत' त्यांनी भक्तांचे निरनिराळे प्रकार दाखविले आहेत. कलियुगात कीर्तन श्रेष्ठ मानले आहे. ते जेथे चालले असेल ते सभाश्रेष्ठ हा त्यांचा अभिप्राय सुद्धा परमार्थिक संस्कारक्षम मनाचा नमुनाच आहे. त्याचप्रमाणे 'नरदेहस्तवना' च्या समासात रामदासांची लेखणी याच ध्ययाने स्फुरण पावते. तो देह तेजःपुंज नसेल, त्या देहावर होणा–या संस्कारांचा उपयोग होत नाही. देह कामाला लावण्या ऐवजी त्याला जपण–यांची संख्या अधिक यासाठी समर्थांनी घराचे जे उदाहरण घेतले आहे, त्यातून त्यांची प्रतिभा दृष्टीस पडतें. समर्थ लिहितात, 'ऐसे शरीर बहुतांचे । मुर्ख म्हणे आमुचे ।। हा मूर्खपणा टाकून, देह संस्कारीत करुन परमार्थी लावावा. हे त्यातील खरे सारसर्वस्व आहे. इतर संतांच्या मानाने समर्थांनी केलेले हे स्पष्टीकरण अधिक संपन्न आहे. मूर्खांची लक्षणे सांगण्यासाठी रामदासांनी पूर्ण एक दशक लिहिला आहे. मूर्खात सुद्धा अनेक प्रकार असतात. ते स्पष्टपणे दिसण्यासाठी समर्थांनी उत्तम पुरुषांचे गुण सांगितले आहेत. उत्तम पुरुषाने आपले वर्तन कसे राखावे, त्याच्या पुढे असणारे ध्येय त्याने असे कसे तडीला न्यावे याचा उपदेश समर्थांनी व्यवहाराच्या पातळीवर समजावून सांगितला आहे.

ज्ञानेश्वरांपासून तें तुकारामांपर्यंत होऊन गेलेल्या सर्व संतांनी परमेश्वराबद्दल आपली भक्ती स्पष्ट करण्यासाठी मधुराभक्तीचा आश्रय घेतलेला आहे. मधुराभक्ती म्हणजे शृंगारातून परमार्थाकडे नेणारी भक्ती होय. सर्व संतांनी कमी अधिक प्रमाणात याचा वापर केला आहे. ज्ञानेश्वरांनी भक्त व देव यांच्यातील संबंधाला 'तों वल्लभा मी कांता '[2] ही उपमा दिली आहे व त्याचे समर्थनही केले

आहे. नामदेवांनी सगुणभक्तीचा महिमा गाईल्याचे सर्वांना माहित आहेच. त्यांनी कृष्णचरित्रावर शृंगारिक व रसाळ वर्णने केली आहेत. तर एकनाथांच्या 'गौळणी' प्रसिद्ध आहेत. तुकारामांसारख्या स्पष्टवक्त्या संतानेही हा मार्ग अवलंबला आहे. परंतु रामदासांना मात्र या मधुराभक्तीचा आश्रय घ्यावासा वाटला नाही. त्यांनी प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालताना व्यवहारातील दाखले घेतले आहेत.

समर्थ वाड्.मयावर अनेक मान्यवर अभ्यासू अशा व्यक्तींनी अभ्यास केला आहे. पण तो परिपूर्ण स्वरुपात झालेला नाही. कारण रामदासांनी आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत लेखन केले आहे. ते त्यांच्या जीवनाबरोबरच विराम पावले.

**नामदेव व रामदास तुलना :**

नामदेवांनी भागवत् धर्माचा प्रचार थेट पंजाब पर्यंत केला. ते भक्तीमार्गाचे महत्व स्पष्ट करण्यासाठी आणि त्यातील सार घेण्यासाठी . 'सर्व खटपट सांडोनी । पांडुरंग मनीं भावें घ्यावा ।।' असे म्हणतात, तर रामदास 'मना सज्जना भक्तीपंथेचि जावे ।' असे सांगताना प्रपंचाची भक्ती करण्याऐवजी भक्तीचाच प्रपंच करण्यास सांगतात. या दोन संतकवींनी मनाला उद्देशून जे काव्य लिहिलेले आहे त्या दोन्हीचा तुलनात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे. तुलना करणे म्हणजे सरस निरस ठरवणे नव्हे. तर त्या दोन्ही संतकवींच्या कवितेमागील प्रेरणा व तिचे स्वरुप स्पष्ट करणे असा असावा. 'मन एवं मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयो :।[2] असे एक वचन आहे. मानवाचे मन हेच मानवाच्या बंध किंवा मोक्षाला कारण असते. कारण मन ताब्यात ठेवल्याने आत्मसाक्षात्कार होऊ शकतो. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात, 'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचें कारण ।।' दुबळे मन माणसाचे अध:पतन घडवून आणते. माणूस मोहजाळात अडकतो. ज्याचे मन सामर्थ्यवान असते तो माणूस समर्थ होतो, व अखंड अद्वैतसुख भोगतो. म्हणून रामदास आणि नामदेव यांना 'मनास उपदेश' करण्याची प्रेरणा झाली असावी.[5] म्हणूनच या दोन संतांचा मनोबोध अभ्यासनीय झाला आहे.

नामदेव हे समाज – सहृदय होते ; तर रामदास हे प्रबोधनकार होते. त्यांनी शिक्षकाची भूमिका अंगिकारली होती. नामदेवांनी आपल्या अभंग – गाथेत काही अभंग 'मनास उपदेश' म्हणुन केलेले आहेत. तर रामदासांनी 'मनाचे श्लोक' लिहिले. त्यांनी त्याला 'मनाची शते' असे संबोधले आहे. रामदासांनी मनास 'मना सज्जना' असे म्हणून, अतिशय हळुवारपणे मनाला जागे करुन वाटेवर आणण्याचा प्रयत्न केला आहे. तर नामदेवांनी मनास 'अरे अलगटा माझिया तूं मना । किती

रानोरानां हिंडविसी ?।।[43] असा प्रश्न केला आहे. त्यांनी मनाला माकड, चांडाळ, पापी, लंपट अशी दूषणे लावली आहेत. रामदासांनी मात्र 'मना वीट मानूं नको बोलण्याचा ' अशी विनवणी करत 'वन्ही तो चेतवावा रे ' असे आव्हान केले आहे. नामदेव मात्र मनास रोखठोकपणे विचारीत आहेत की, 'कारे तुज भ्रांति पडलीसे मूढा । वेढी चहूकांडा काळ सैन्य ।' याचे कारण रामदास आणि नामदेव हे दोघेही वेगवेगळया भूमिकेतून विचार करत आहेत. रामदासांनी प्रेमळ शिक्षकाची भूमिका घेऊन धर्मावर आधारित सद्वर्तन कसे करावे हे उदाहरणे देऊन पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. उदा – 'जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें । जनीं वंद्य ते सर्व भावें करावें ।' तर नामदेवांनी मनाला आपला मित्र समजून त्याच्याशी गुजगोष्टी केल्या आहेत. म्हणून त्यांच्या अभंगातून कळकळ दिसून येते. ते मनास म्हणतात, " हे मना तू एकटा एकांतात बसून नीट विचार कर. तुला खरी विश्रांती कोठे मिळेल ? चौ–याऐंशी लक्ष योनीनंतर जरी हा मानव देह मिळाला असला तरी तो संसारसुखात वाया दवडण्यासाठी नाही. प्रपंचाचा कितीही मोह धरलास तरी शेवटी त्यापासून सुख न होता दुःख तेवढे तुझ्या वाटयाला येईल. हे सर्व मृगजळ आहे, केवळ नजरेचा धोका आहे. हे तुझ्या लक्षात येऊ नये ?" असे नाना प्रश्न ते मनास विचारतात. माणूस ईश्वराची प्राप्ती करुन घ्यायची सोडून संसारातील मोहात अडकून पडतो तें बघून ते गहिवरतात. आणि ते मनास प्रश्न करतात "परीस समजून खापर का घेतोस ? इंगळाच्या शेजेवर सुखाने झोप तरी येईल का ?" याची उत्तरे माहित असली तरी माणूस संसारात अडकून पडतो. आपले भविष्य आपल्या हातात नाही, हे त्यांच्या लक्षात येत नाही. 'जो जो क्षण लाविसी हरिभजनाकडे । तो तो गांठी पडे सार्थकीं रे ।।' हे नामदेवांचे म्हणणे जर माणसांच्या लक्षात आले असते, तर माणूस चिरंतन स्वात्मसुखाच्या साम्राज्यावर आरुढ झाला असता. नामदेवांना जीवनाचा अर्थ समजला होता. ते जीवनमुक्त झाले होते. रामदासांचा पिंडच समाजशिक्षकाचा असल्यामुळे ते सांगतात, 'मनाच्या श्लोकांत' रामदास मनास समजावून सांगताना दिसतात. प्रपंचविज्ञान, क्षात्रधर्म, राजकारण, परमार्थ या सर्वांचे महत्व ते एखाद्या शिक्षकाच्या भूमिकेतून समजावून सांगतात. त्यामुळे त्यांनी केलेले विवरण हे सुसंगत आणि तर्कशुद्ध असते. एखादा विचार समाजमनावर बिंबवण्यासाठी तें त्याची जाणीवपूर्वक पुनरुक्ती करतात. 'सदा संगती सज्जनाची धरावी' अशा साध्या सोप्या शब्दांत ते सत्संगाचे महत्व वर्णन करतात. सज्जन माणूस म्हणजे 'जयाचेनि संगे महादुःख भंगे । जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ।' असा माणूस होय. नामदेव हे काही अभंगात प्रेमाने आपल्या मुलाला कुशीत घेणा–या मातेच्या भूमिकेत असतात. त्यामुळे त्यांच्या अभंगातून वात्सल्य, जिव्हाळा ओतप्रोत भरलेला दिसतो.

नामस्मरणाचे महत्व सर्वच संतांनी वर्णन केले आहे. किंवा असे म्हटल्यास वावगे होणार

नाही की, नामःस्मरणाचे महत्व सांगितल्यावाचून कोणत्याही संताचे भक्तिमार्गाचे विवेचन पुरे होत नाही.[5] ज्याच्या जवळ नामस्मरणाचे सामर्थ्य असते, त्याच्यासाठी मोक्षाची कवाडे सदैव उघडी असतात. संसार हा दुःख, दैन्य, वासना यांचा सागर आहे, तो तरुन जाण्यासाठी नामाशिवाय दुसरे जालीम औषध नाही. म्हणून रामदास म्हणतात, 'प्रभाते मनीं राम चिंतीत जावा।' आणि नामामुळे महादोष सुद्धा नाहीसे होतात. यासाठी त्यांनी मारुती, अजामेळ, कुंटीण, व प्रल्हाद यांच्या कथा सांगितल्या आहेत, आणि मनाला उपदेश केला आहे की, 'मना मत्सरें नाम सांडू नको हो ।' नाम घेताना ते कसे घ्यावे याचेही विवरण रामदास करतात, "नाम घ्यायचे ते अतिआदरपूर्वक घ्यावे. त्याचा जयघोष करावा आणि ते स्पष्टपणे घ्यावे." तरच श्रीहरी पावेल. हा त्यांचा ~~नामावर असलेला~~ विश्वास नामाच्या सामर्थ्यावर दिसून येतो. नामदेवांचाही विश्वास नामाच्या सामर्थ्यावर आहे. 'धरीरे मना तू विश्वास या नामीं । अखंड रामनामीं ओळखी धरी ॥' नामामुळे साधकाला शक्ती प्राप्त होते. त्याला काळाचेही भय वाटत नाही. नाम जरी स्वतः सिद्ध असले तरी ते सद्गुरु कृपेशिवाय सार्थकी होत नाही. नामामुळे आत्मसाक्षात्कार होतो. तेथे तू – मी असा भेदभाव न राहता मन एकाकार होते. म्हणून नामदेव म्हणतात, 'वेदीं तोचि शास्त्रीं सर्वाठायीं तोचिं पुराणांत तोचिं अंतःकरणी ।। नाम सदा ध्यायीं नाम सदा ध्यायीं। रामनाम ध्यायीं अरे मना ॥' वेदात, शास्त्रात, पुराणात आणि अंतःकरणात तोच भरुन राहिला असल्याकारणाने त्याचे नाम घेऊन तू आपला जन्म सार्थकी लाव. कारण हा मानव जन्म पुनःपुन्हा मिळणार नाही. नामामुळे तुला पुन्हा जन्ममृत्यूच्या फेऱ्यात अडकावे लागणार नाही. नाम हे सार आहे. ते ज्याच्या हाती लागेल त्याला चिंतामणी रत्न मिळाल्या सारखे आहे. नाम हे प्रत्यक्ष देवापेक्षाही श्रेष्ठ आहे. नामासारखे अमृत तुमच्या जवळ असल्यावर तुम्हाला काय भिती ! नामरुपी कामधेनू तुमच्या सेवेला सदैव हजर असताना तुम्हाला काय कमी पडणार ! बेलगाम घोडयाला ताब्यात ठेवण्यासाठी ज्याप्रमाणे लगाम हाती असावा लागतो, त्याप्रमाणे बेलगाम मनाला ताब्यात ठेवण्यासाठी नामाचा लगाम आपल्या हाती असणे आवश्यक आहे. नामःस्मरणाने सर्व प्रपंचच नादमय होऊन जातो. याचा नामदेवांना अनुभव आहे. नामाचा महिमा गात असताना त्यांच्या वाणीला वासंतिक बहर येतो. जर मनाचा दीप प्रज्वलीत झाला तर आत – बाहेर सर्वत्र प्रकाशमय होऊन जाईल हे सांगत असताना त्यांची वाणी मोहरुन जाते. मनाला आनंद देणारे नाम कधीही सोडू नये असे मनाला नामदेवांचे आग्रहाचे सांगणे आहे. 'मनाच्या श्लोका' तही रामदासांनी हेच सांगितले आहे. नामामुळे पाषाणही पाण्यावर तरंगतात. हे फुकटचे नाम घ्यायला तुझे काहीच जात नाही. त्यात तुझा फायदा मात्र होतो. 'म्हणोनी अती आदरें नाम घ्यावें मुखें बोलतां दोष जाति स्वभावें ॥' असे ते सांगतात. नाम एक कवडीही खर्च न करता विनासायास

मिळते. ते घ्यायला अतिशय सोपे असूनही माणूस मात्र संसाराच्या मायामोहात गुरफटून जातो, त्यामुळे त्याला नामस्मरणाचे भानही राहात नाही.

रामरायाचे नामस्मरणाने सर्व दोष नाहीसे होतात. त्याचे रुप जर आकाशासारखे आहे असे मानेल तर सर्व बंधने तुटतात आणि मोक्ष मिळतो. हे माहित असूनही माणूस त्या परमपित्यावर प्रेम करायचे सोडून आपल्या देहावरच प्रेम करु लागतो. जोपर्यंत माणूस आपल्या देहावर प्रेम करायचे सोडून त्या राघवावर प्रेम करत नाही, त्याला आपलासा करुन घेत नाही, तोपर्यंत त्याला मोक्षाची वाट दिसत असूनही त्या वाटेवर जावेसे वाटत नाही. नामदेव हे संसारप्रमाणे युक्तीवादाने विषय स्पष्ट करुन सांगत नाहीत. नामदेवांना चिंतन करताना जे जाणवले, जे त्यांच्या अनुभवास आले त्याला त्यांनी शब्दरुप दिले. मन हे मोहाच्या मागे धावत सुटते. त्याला पापाचीच गोडी वाटते. मनाला देवधर्मात अजिबात रस वाटत नाही, याची खंत नामदेवांना वाटते. आणि मग ते आपल्या डोळयासमोर भविष्याचे चित्र उभे करतात, 'अरे तूं अभिलाषिसी परनारी । तेणें सिद्धपंथ राहेल दुरी । जवळी येईल यमपुरी । आपदा पावसील ।। आतां तुज वाटतसे गोड । अंतकाळीं जाईल जड । महादोष येति सुखा आड । करितील कईवाड यमदूत ।।4।।'

अशा या भ्रमिष्ट मनाला जागे करण्याचा आटापिटा नामदेवांनी केला आहे. त्यांच्या अभंगातून त्यांच्या वाणीचे विविध रंग नजरेस येतात. असे वाणीचे विविध रंग रामदासांच्या 'मनाच्या श्लोका' तून नजरेस येत नाहीत. रामदासांच्या लेखनाचा घाट वेगळाच आहे. 'मनाचे श्लोक' हे एकसूरी नाहीत. त्यात विविधता आहे. 'दासबोधांत जो विषय विस्तृतपणे सांगितला आहे, त्याचेच सार 'मनाच्या श्लोकांत' सांगितले आहे. या श्लोकांतून रामदासांनी परमात्म्याच्या सगुण व निर्गुण स्वरुपाची ओळख विविध दाखले देऊन करुन दिली आहे. मनाच्या श्लोकींच्या पूर्वार्धात सगुण व निर्गुण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, राम आणि ब्रम्ह हे दोन नसून एकच आहेत, या संसारपाशातून सुटण्यासाठी सगुण भक्ती करावी असे त्यांनी सांगितले आहे. उत्तरार्धात मात्र त्यांनी निर्गुणभक्तीच सांगितली आहे. "निर्गुण ब्रम्ह शाश्वत, अनंत व भयातीत आहे. तेथे द्वैत नाही म्हणून भयही नाही. ते सर्वांचे जुने ठेवणे आहे." असे सांगून 'जुने ठेवणें मीपणें आकळेना ।।' असा सिद्धांत रामदासांनी मांडला आहे.

नामदेव हे रामदासांसारखे काही सिद्ध करत नाहीत. ते त्यांच्या वाटयाला जे आले, त्यांनी जे भोगले ते त्यांनी शब्दरुप केले. [6] अहंकार हाच मानवाचा मोठा शत्रू आहे. अहंकारामुळे त्याला दुःख भोगावे लागते. माणसाच्या मनातून जर अहंकार नाहीसा झाला तर तो ब्रम्हरुप होईल. माणूस

ब्रम्हरुप होण्यासाठी त्याला गुरुकृपा झाली पाहिजे. एकदा का गुरुकृपेचा सूर्यादय झाला की अहंकाररुपी अंधकार नाहीसा होईल. आणि जीव मुक्तीचा आनंद सोहळा उपभोगेल. म्हणून रामदास म्हणतात, 'म्हणे दास, सायास त्याचे करावे । जनी जाणता पाय त्याचे धरावे ।। गुरु - अंजनेवीण तें आकलेना ।। जुनें ठेवणें मीपणें आकलेना ।। रामदासांचे हे सांगणे प्रचीतीचे आहे. अज्ञानामुळे, अहंकारामुळे आणि भ्रमामुळे आपले हीत काय आणि अनहीत काय हेही माणसाला समजत नाही. रामदास हे योग्य वेळी सावध झाले. त्यांनी अंतर्मुख होऊन ईश्वरस्वरुपाचा शोध घेतला. हा शोध घेत असतानाच त्याचे भ्रम, भ्रांती, अज्ञान दूर झाले. जे त्यांना नुसत्या डोळयांनी दिसले नाही ते त्यांना ज्ञानामुळे दिसू लागले. गुरुकृपेशिवाय हे शक्य होणार नाही हे रामदासांनी जाणले होते. नामदेवांना तर त्याची साक्षात अनुभूतीच होती. 'जवं सद्‌गुरु नाहीं केला भ्रतार । साधनविचार व्यर्थ गेला ।।' असे नामदेव सांगतात.

सत्संगाचे महत्व नामदेवांनी सांगितले आहे. 'नको नको मना हिंडो दारोदारीं । कष्ट झाले भारी वायांविण ।। कल्पना सांडोनि संतासंगे राहीं । सर्व त्यांचे पायी सुख आहे ।। जयाचिया दर्शनें शोक मोह जळे । पाप ताप पळे काळभय ।।' संताच्या सहवासामुळे जन्मोजन्मींची पापे धुतली जातात. नाहीतर माणूस वासनारुपी दरीतच राहतो. म्हणून रामदास म्हणतात, 'मना, वासना दुष्ट कामा नये रे ।' या वासनांच्या दरीतून वर यावे, त्यांचा नाश व्हावा यासाठी सद्वर्तनावर रामदासांनी भर दिला आहे. ते म्हणतात, 'मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें । मना बोलणें नीच सोशीत जावें ।। स्वये सर्वदा नम्र वाचे वदावें । मना, सर्व लोकांसि रे नीववावें ।। तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना, हेचि क्रीया धरावी ।।' रामदास सर्व मनाच्या श्लोकांतून नीतिशास्त्र समजावून सांगत आहेत. हे समजावूनसांगत असताना त्यांची सर्वांचे हीत करण्याची दृष्टीच दिसतें. माणूस वासनांचा दास सहजासहजी बनतो. नामदेव वासनांच्या खेळाचे अतिशय सुंदर वर्णन करतात. 'वासनेची करणी ऐकें तूं मना । या केली रचना ब्रम्हांडाची ।' वासनेमुळे मन सतत अस्थिर असते. नामदेव जेंव्हा त्याचे वर्णन करु लागतात. तेंव्हा त्याच्या शब्दकलेचे सामर्थ्य नजरेस येते. नामदेवांच्या अभंगात सर्वांना अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य आहे. म्हणून नामदेव म्हणतात, "निर्गुण, आनंदमय ब्रह्माला देखील वासनेने चौ-याऐंशी लक्ष सोंगे दिली, तेथे हे मना, तू दूबळा काय करु शकशील ? क्षणात निश्चलता, तर क्षणात चंचलता, क्षणात विफलता, तर क्षणात सावधानता, क्षणात कृपाळू तर क्षणात निष्ठूर; क्षणात कृपण तर क्षणात उदार ; क्षणात सात्विक तर क्षणात राजस ; क्षणात प्रवृत्ती तर क्षणात निवृत्ती ; क्षणात विश्रांती तर क्षणात संताप ; क्षणात आवड तर क्षणात नावड ;

क्षणात दुःख : तर क्षणात सुख, असे या वासनांचे खेळ ।" म्हणून जर संतसंग लाभला तर वासनांतून सुटका होईल अशी नामदेवांची खात्री आहे.

नामदेव विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलाला प्रत्यक्ष आपल्या समोर पाहतात. आणि त्यांचे हृदय आनंदाने नाचू लागते. तर रामाची मूर्ती नजरेसमोर येताच रामदास राममय होतात. आणि म्हणतात, 'घनःशाम हा राम लावण्यरुपो । महा धीर गंभीर पूर्ण प्रतापी ।। करी संकटी सेवकांचा कुढावा ।। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।' तर नामदेव म्हणतात, 'गोविंदा रे, तुझें ध्यान लागों मना । पाहिजे प्रेमपद निर्मळ होत जाता ।।' ते विठ्ठलाचे सुंदर रुप पाहून त्याची दृष्ट काढू लागतात. रामदास काय किंवा नामदेव काय, आपल्या इष्टदेवतांचे चित्र शब्दरुप करताना आपले अस्तित्व विसरुन जातात. 'दिनानाथ हा राम कोदंडधारी' असा श्रीराम त्यांच्या जवळ असताना कैवल्याचा वृक्ष त्यांच्या हाती असल्याचे सुख रामदासांना मिळते. आणि 'नुपेक्षी कदा राम दासाभिमानी' असा विश्वासही ते प्रगट करतात. नामदेव ईश्वररुप पाहताना तन्मय होऊन जातात. आणि म्हणतात, 'परब्रम्ह विश्वाकारें अवतरलें भक्तिकाजा । मूर्ति सुनीलु सावळी केशिराजु स्वामी माझा ।।' विठ्ठलाचे रुप वर्णन करत असतातना त्यांच्या वाणीला बहर येतो. नामदेवांना विठ्ठलाचे दर्शन मिळसल्याने ते तृप्त, कृतार्थ झाले होते. ते 'नामा तोचि केशव केशव तोचि नामा ।।' या पदाला पाहोचले होते.

'मनाच्या श्लोकांत' रामदासांनी आयुष्यभर केलेले चिंतन दिसते. तर नामदेवांच्या 'मनास उपदेश' यात त्यांच्या अनुभव प्रतिबिंबित झालेला दिसतो. [7] संताची कविता ही एखाद्या दीपस्तंभासारखी असते. तो ज्याप्रमाणे अंधारातही वाट दाखवत असतो, त्याप्रमाणे संताची कविता ही सदैव मार्गदर्शन करीतच राहते.

## वारकरी संप्रदायाहून समर्थ संप्रदायाचे वेगळे वैशिष्ठ्य :

वारकरी संप्रदाय म्हणजे महाराष्ट्रीय संताचा भागवत धर्म होय. हा भागवत धर्म विशाल आणि व्यापक वैदिक धर्माचेच एक विकसीत रुप आहे. समर्थ रामदासांनी ज्ञानेश्वर वगैरे संत ज्या भागवत धर्माच्या परंपरेत नांदले आणि भागवतोत्तम ठरले, त्याच भागवत धर्माचा एक खळाळून वाहणारा स्वतंत्र प्रवाह 'स्वरुप संप्रदाया' च्या मार्फत स्थापीत केला. लोकसंस्थेच्या संरक्षणासाठी व जनकल्याणासाठी 'आपला आणि परावा' अशी द्वैत भावना मनात न बाळगता आणि विवेकावर आधारीत असलेल्या समतेच्या भावनेने आणि बुद्धीने 'बहुत जनांस चालविणारी' आणि 'नाना मंडळे हालविणारी' अशी रामदासी परंपरा निर्माण केली. ही रामदास्याची परंपरा निर्माण करुन रामदासांनी महाराष्ट्रातील द–याखो–यातून नवचैतन्य निर्माण केले. वारकरी संप्रदाय हा हरिहरऐक्याची उदात्त भावना असलेला समन्वयवादी पंथ आहे विष्णूने कृष्णावतार घेतलेला असतानाचा एक अविष्कार म्हणजे श्रीविठठल होय. हरिहरऐक्याचे प्रतीक म्हणून विठठलाच्या डोक्यावर शिवलिंग असल्याचा अतूट विश्वास वारक–यांच्यात रुढ आहे. [8] त्या हरिहरऐक्यरुप विठठलाच्या पुढे नतमस्तक होऊन महाराष्ट्रांच्या पारमार्थिक जीवनात समता स्थापन करण्याचे अतिशय महत्वाचे काम पूर्वी होऊन गेलेल्या संतांनी केले होते. परंतु सोळाच्या शतकात समाजास महत्वाकांक्षी बनवून त्यांच्या पुरुषार्थास व पराक्रमास आवाहन करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती.

स्वधर्माला ज्या स्वसत्तेचे अधिष्ठान असावे लागते, ते प्राप्त होण्यासाठी जे गुण आवश्यक असतात, ते सर्व गुण रामचरित्रात एकत्रित झालेले दिसून येतात. रामाची कथा ही आदर्श कथा आहे. जनमानसातील राम जागृत करण्याचे कार्य संत एकनाथानी आणि कृष्णदास मुद्‌गलांनी केले होते, परंतू रामदासांनी ही संजीवनी देणारी रामकथा गाऊन 'ब्रहमाण्डाला भेदून पैलाड' नेण्याचे कार्य केले. यासाठी त्यांनी भागवत धर्माचाच हात धरुन व त्यापासून आदर्श घेऊन आपला संप्रदाय स्थापन केला. समर्थ संप्रदायाच्या आधारे 'पहिले हरिकथा – निरुपण । दुसरे ते राजकारण।' साध्य करण्याची व हे करत असताना 'भगवंताचे अधिष्ठान' ठेवून 'देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा । मुलूख वडवा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ।।' अशाप्रकारे त्यांनी स्वधर्मजागृतीची प्रेरणा महाराष्ट्रात निर्माण केली. [9]

वारकरी संतांचा भागवत – धर्म आणि रामदासांनी वर्णन केलेला महाराष्ट्रधर्म यात तात्विक दृष्टया फारसा फरक नाही. वेदप्रामाण्य, अद्वैतनिष्ठा, वर्णा–श्रमधर्म, सगुणधर्म या सर्व गोष्टीत भागवत – धर्म आणि महाराष्ट्रधर्म या दोन्हीतही बरेच साम्य आहे. कर्मयोगावर दोन्ही धर्मांचाही अतूट विश्वास आहे. परंतू रामदासांनी प्रपंच आणि परमार्थ या दोघांना एकाच पातळीवर आणण्याचे एकनाथांचे काम पूर्णत्वास आणले आहे. हे काम – करीत असताना त्यांनी आपला किंवा

दुस-याचा असा भेदभाव केला नाही. त्याचप्रमाणे त्यांनी या समाजाचे धुरा ज्या क्षत्रिय व ब्राम्हण वर्गावर होती त्यांना प्रथम आवाहन केले व त्यांना आपापल्या कर्तव्याची जाणीव करुन दिली. व 'आधीं केले मग सांगितले' या तत्वज्ञानाप्रमाणे स्वतः वागून दाखविले.

वारकरी संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय याची तुलना करत असताना या दोन्ही संप्रदायाची परमार्था विषयी असणारी दृष्टी लक्षात घेतली असता या दोन्ही संप्रदायांत मुलभूत असा काहीच फरक नाही असे दिसून येते. दोन्ही संप्रदायांत नामःस्मरण आणि भक्ती ही सारखीच आहे. दोन्ही संप्रदायांवर औपनिषदिक तत्वज्ञानाचा संस्कार झालेला आहे. एकाने चंद्रभागेच्या काठी वैष्णवांची म्हणजेच वारक-यांची मांदियाळी मेळविली तर दुस-याने परळीला समर्थांचे सेवक एकत्र करुन संप्रदायाची स्थापना केली. ज्ञानदेवादि वारकरी संत व रामदास या दोघांनाही शंकराचार्यांचे अद्वैत आणि मायावादी तत्वज्ञान मान्य आहे. [10] ज्ञानेश्वरांच्या कार्याची मुलभूत प्रेरणा 'ब्रह्मविद्येचा सुकाळ' किंवा 'अध्यात्म' ही होती. त्याचप्रमाणे समर्थ रामदासांनाही प्रत्येक कार्यात 'भगवंताचे अधिष्ठान' असणे गरजेचे वाटत होते. ज्ञानदेवांचा श्री विठठल आणि समर्थांचा श्रीराम ही दैवते श्री विष्णूचाच अंश आहेत. म्हणूनच वारकरी संप्रदाय व समर्थ संप्रदाय या दोन्ही संप्रदायाची मुलभूत प्रेरणा, तिचे स्वरुप आणि त्यांची विचारसरणी एकच होती. परंतु वारकरी संप्रदायाच्या तुलनेत समर्थ संप्रदायावर कोणते आक्षेप घेतले जातात यांचा साकल्याने विचार करणे गरजेचे आहे.

आचार्य स. ज. भागवतांच्या मते ज्ञानदेवादी संतानी प्रतिपादिलेल्या समतेच्या मार्गात ब्राहमणांच्या कल्पनेची धोंड आणून सामाजिक प्रगतीचा गाडा मागे नेणारा रामदास एक प्रतिगामी संत असून वैदिक धर्माची परंपरा राखण्यापलीकडे त्याने अधिक काही केलेले नाही.[11] प्रा. गं. बा. सरदारांच्या मते राजकीय दृष्टया समर्थांचे कार्य जरी संस्मरणीय असले, तरी त्यांची सामाजिक विचारसरणी प्रतिगामीच आहे. महाराष्ट्र धर्माच्या द्वारे सनातन वैदिक परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याची त्यांची मनिषा होती. वर्णभेद व त्यातील ब्राम्हण वर्चस्व त्यांना टिकवून धरावयाचे होते. भागवतधर्मीयांनी धार्मिक समतेचा पाठपुरावा केला ; पण रामदासांनी मात्र सर्वत्र ब्राम्हणांच्या श्रेष्ठतेचा पाढा वाचला आहे. [12] रे. डेमिंग सारख्या समार्थाभिमान्यालाही रामदासांच्या शिकवणुकीत ख्रिस्ताप्रमाणे समतेचा किंवा विश्वबंधुत्वाचा संदेश सापडला नाही, उलट त्यांचे तत्वज्ञान चातुर्वर्ण्याच्या कल्पनेवर अधिष्ठित असलेले दिसते. [13] इतर अनेक टिकाकारांनी रामदासांवर जो आक्षेप घेतला आहे, त्या सर्वांचा सूरही मुख्यत्वेकरुन असाच आहे.

रामदासांच्या शिकवणुकीचा आणि कार्याचा परमार्थ हाच आत्मा आहे. हे सर्व समर्थांच्या

आक्षेपकांनी लक्षात घ्यावयास हवे होते. त्यांनी या परमार्थमार्गात फक्त ब्राह्मणांनाच अधिकारी मानले नसून इतर वर्णीयांना त्यापासून वेगळे ठेवले आहे असे काही झालेले नाही. किंवा त्याचा दाखलाही कुठे सापडत नाही. समर्थांनी भजनांची व्याख्या 'भेटो कोणी एक नर । धेड महार चांभार । त्यांचे राखावें अंतर । या नांव भजन ।।' अशी सांगितली आहे. असे असताना सुद्धा ज्ञानेश्वर वगैरे संतांनी सांगितलेल्या समानतेच्या वाटेवर ब्राह्मणांचे वर्चस्व सांगणारे समर्थ हे कसे बरे प्रतिगामी ठरतील? समर्थांनी दासबोधातील लक्षणे सांगितली आहेत. त्यात कुठेही त्यांनी शिष्य ब्राह्मण असावा असे सांगितलेले दिसत नाही.त्याचं प्रमाणे काळ सामर्थकचि करावा। जनासहित, किती लोक ते कळेना। किती समुदाय आकलेना । सकळ लोक श्रवणमनना। मध्ये घाली।,जितुकें आपणांसि ठावें। तितुकें हळुहळु सिकवावें। शहाणे करून सोडावे। बहुतजन।।, नभामाजी तारांगणे।तैसे लोक," बहुत जनांस चालवी।।, नाना मंडळे हालवी । ऐसी हि समर्थ पदवी। विवेक होते।" यासारख्या उक्तीतून समर्थांची बहुजन समाजाच्या उन्नतीविषयी असणारी तळमळ व्यक्त होते. या उक्तींच्या आधारे समर्थ रामदासांना " ब्राह्मणांचे पक्षपाती, म्हणजे योग्य होईल काय? समर्थांना जर बहुजन समाजाविषयी प्रेम नसते तर त्यांनी भारूडवाङ्मयाची निर्मिती करून बहुजन समाजातील जागृतीचे कार्य केले नसते. व या कार्याचा प्रचार व प्रसारही केला नसता. बहुजन समाजातील खालच्या थरातील लोकांना समाजचित्र कळावे या त्यांच्या मनापासूनच्या तळमळीने त्यांनी भारूडे रचलेली दिसुन येतात. यावरून त्यांनी वर्णाश्रमधर्माचा स्विकार पारमार्थिक क्षेत्रातही केलेला दिसून येतो, या त्यांच्यावर घेतल्या जाणा-या आक्षेपाला काहीच अर्थ उरत नाही.

समर्थ रामदासांनी बारा वर्षे असेतु हिमाचल अशी तीर्थयात्रा केली होती. हे भारत भ्रमण करीत असतानात्यांनी त्यावेळच्या लोकस्थितीचा व धार्मिकस्थितीचा अभ्यास केला होता. म्हणून त्यांनी हरिकथानिरूपणाला प्रथम स्थान दिले असले तरी दुसरे स्थान राजकारणाला दिले होते. कारण स्वधर्म हा स्वराज्यावर आधारीत होता. स्वराज्य जर निर्माण करायचे असेल तर समाजाच्या मनात स्वधर्माची ज्योत प्रज्वलित करणे गरजेचे असते. हे कार्य करण्यासाठी त्यावेळचा ब्राह्मण समाज अधिक सक्षम होता. त्यामुळे रामदासांनी काही ठिकाणी ब्राह्मण्याचा पुरस्कार केलेला दिसून येतो. हे त्यांचे करणे व्यवहारदृष्टीने योग्यच होते असे म्हणावे लागेल. एकदा का ब्राह्मण समाज प्रबुध्द होऊन कार्यप्रवण झाला की हळूहळू सर्व समाज जागृत होईल, अशी त्यांची त्यामागची दृष्टी असावी.

" समर्थ संप्रदायात वर्णाश्रमधर्मावर आधिक भर दिला होता, याही आक्षेपाला काहीही अर्थ नाही. कारण वर्णाश्रमधर्माचा पुरस्कार करू पाहणा-या पंथांची स्थिती काय झाली होती ते समर्थांसारख्या चतुरस्त्र, बुद्धीच्या व्यक्तीला ज्ञात नसावे हे म्हणणे बरोबर होणार नाही. तसेच ज्ञानदेव- नामदेवांपासून ते तुकारामांपर्यंतच्या वारकरी संप्रदायातील

संतांनीही वर्णाश्रमधर्माचा पुरस्कार केल्याचे कितीतरी दाखले देता येतात. 'तुम्हां वर्णविशेषवशें । आम्ही स्वधर्मुचि विहिला असे ' संतवाङ्.मयाची फलश्रुती सांगताना प्रा. सरदारांनी 'संताच्या चळ ळीचे क्षेत्र ब-याच अंशी धार्मिक व सांस्कृतिक होते, सामाजिक जीवनातील मुलभूत प्रश्नांना तिने हात घातला नाही ' असाच अभिप्राय दिला आहे. हा अभिप्राय वारकरी संताच्या कार्याला जेवढा लागू पडतो, तेवढाच समर्थ रामदासांच्या कार्यालाही लागू पडतो. 'चहूंवर्णा नामाधिकार । नामीं नाही लहान थोर । जडमूढ पैलपार । पावती नामे ' सामान्यातील सामान्य माणसांनाही भक्तीतून अध्यात्मिक प्रगती साधता यावी, कर्मयोगाने प्रपंचाची गुंतागुंत हळूहळू सोडविता यावी, हेच वारकरी संप्रदायाप्रमाणे समर्थ संप्रदायाचेही मुख्य कार्य मानले गेले होते. समर्थ संप्रदायातील महंतमंडळीत ब्राम्हणांचाच भरणा अधिक होता, कारण समाजात प्रथम प्रबोधन होते ते उच्च वर्णियात, म्हणून समर्थ संप्रदायातील महंतमंडळीत ब्राहमणांचाच भरणा अधिक होता. समर्थ संप्रदायाप्रमाणेच चक्रधर संप्रदायातही ब्राम्हणांचा भरणा अधिक होता. समर्थ संप्रदायाप्रमाणेच चक्रधर संप्रदायातही ब्राह्मणांचाच भरणा अधिक होता. वारकरी संप्रदायात कोणत्याही जातीधर्मातील गुरु करण्याला स्वातंत्र्य होते. परंतू समर्थांनी 'ब्राम्हण यातीचा किंवा स्वयातीचा ' गुरु करावा असा उपदेश केला आहे. 'गुरु तो सकलांसी ब्राम्हण' असे समर्थ रामदास अतिशय आग्रहपूर्वक सांगताना दिसतात. या उपदेशामुळेच त्यांच्यावर ब्राम्हणांचा पक्षपातित्वाचा आक्षेप आला असावा. परंतु समर्थ असा आग्रह धरतात, कारण त्यावेळी ढोंगी, साधु, जोगी, फकीर, कापालिक, शाक्त, वामाचारी हे आपल्या समाजातील भोळेपणाचा फायदा कसा घेतात ते त्यांनी बघितले होते. समर्थांप्रमाणेच एकनाथही ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व सांगताना दिसतात. 'परमार्थ प्राप्तीचें कारण । क्षत्रियासी मुख्य ते गुरु ब्राम्हण ' नाथ भागवतात त्यांनी ठिकठिकाणी ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व वर्णन केलेले आहे. तरी त्यांच्यावर कोणी ब्राम्हणांचे पक्षपाती असल्याचा आरोप केला नाही. एखाद्या विशिष्ट कालखंडाला वेगळे वळण लावण्यासाठी त्या कालखंडातील संत कसोशीने प्रयत्न करत असतात. परंतु त्या समाजाची जी जीवननिष्ठा असते, ती त्यांना तशीच्या तशी स्विकारणे क्रमप्राप्त ठरते. पारमार्थिक क्षेत्रात समता स्थापन करण्यासाठी वारकरी संताइतकीच समर्थांनाही आपली दृष्टी उच्च आणि उदात्त ठेवली होती. याच्यापुढे जाऊन रामदासांनी सामाजिक जीवनात भाग घेतला नाही. कारण समर्थ रामदासांच्या पुढे 'स्वधर्म ' राखण्यासाठी 'नेटका प्रपंच ' आणि 'राजकारण' या दोन प्रमुख प्रेरणा होत्या. वारकरी व समर्थ संप्रदायांच्या प्रेरणा आणि प्रवृत्ती ब-याच प्रमाणात सारख्या होत्या. या दोन्ही संप्रदायाची अंतिम जीवननिष्ठा एकच होती. [14] समर्थांनी प्रपंचात पुरुषार्थावर, प्रयत्नवादावर भर दिला होता, तर वारक-यांना प्रपंचासक्ती टाळायची होती. संत ज्ञानेश्वर आणि संत एकनाथ महाराज

यांच्या कार्याने प्रभावित झालेले समर्थ वारकरी संप्रदायाला विरोध करण्यासाठी आपला स्वतंत्र संप्रदाय प्रवर्तित करतील, अशी कल्पनाच मुळात तर्कदुष्ट आहे. तर ज्ञानेश्वर व एकनाथ यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी पारमार्थिक पार्श्वभूमीवर आपला प्रयत्नवाद व प्रपंचविज्ञान उभारला असे म्हणावे लागेल. 'नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी । यां कारणें तोषवावी । कोणीतरी काया ।।', 'पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें' अशी अतुट श्रद्धा ज्या समर्थ वाणीतून व्यक्त झाली, ती समर्थांची वाणी ब्राह्मणवर्गापुरती मर्यादित होती, हे म्हणणे योग्य तरी आहे काय ?

समर्थ वाङ्.मयावर अनेक मान्यवर अशा अभ्यासकांनी यापूर्वी अभ्यास केलेला आहे. समर्थ रामदासांचे लिखाण हे इतर सर्व संतांपेक्षा अतिशय वेगळे आहे. त्यांचे लिखाण हे त्यांच्या जीवनात सतत चालू होते. त्यांचे आयुष्याबरोबरच त्यांचे लिखाने विराम पावते. इतर सर्व संतांनी सर्वसंगपरित्याग करून हरिभक्ती करायला सांगितली. परंतु समर्थ रामदासांनी मात्र 'आधी प्रपंच करावा नेटका, असे सांगितले. स्वतःब्रह्मचर्य व्रत सांभाळून हरिभक्ती केली परंतू इतर सर्वांना प्रपंचात राहून हरिभक्ती कशी करावी हे अगदी यथार्थपणे सांगितले. समाजातील भौतिकवादाचे स्थान सर्वतोपरी ओळखणारे व त्याचप्रमाणे विचार व्यक्त करणारे असे हे अपवादात्मक संत होते. त्यांचे लिखीन साहित्य आणि त्याच्या संबंधात ज्यांनी ज्यांनी जे जे लेखन केले आहे, ते सर्व साहित्यिकांना आव्हान ठरावे असेच आहे. समर्थ रामदासांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात अंदाजे तीस हजारपेक्षा अधिक ओव्या लिहिल्या आहेत. त्याचप्रमाणे चारशेपेक्षाही जास्त ग्रंथ समर्थांचे तत्वज्ञान, चरित्र, साहित्य इ. संबंधी लिहिले आहे. असे असुनही समर्थ रामदासांच्या कर्तृत्वाचा काढला गेलेला आलेख आजूनही पूर्णावस्थेस पोहोचलेला नाही. असे अनेक विचारवंतांचे, संशोधकांचे मत आहे. तसेच समर्थांसंबंधी जे विविध वाङ्.मय प्रसिध्द झाले आहे, ते पाहता हिंदी, इंग्रजीतच नव्हे तर बंगली, तामीळ, गुजराथी, तेलगू, कानडी, उर्दू इ. भाषिकांनाही समर्थ वाङ्.मयाचे आकर्षण वाटते. समर्थांच्या कर्तृत्त्वाची, विचारांची तुलना हेगेल, जोसेफ मॅझिनी किंवा इटालितील सेंट लोयोला यांच्या बरोबर केली जाते. महाराष्ट्र-भारतात 40–40 वर्षे राहणा–या ख्रिश्चन धर्मगुरूंनाही 'समर्थ रामदास' या नावाची जादू मोहित करते. कारण रामदासांचे व्यक्तिमत्व एकसुरी नसून चतुरस्त्र आहे, म्हणून त्यांचे आकर्षण आजही वाटते आहे.

समर्थांच्या संपूर्ण वाङ्.मयातून त्यांचे 'मनोबोध' हे वेगळे स्फुट काव्य आहे. त्यात समर्थांनी मनात केलेला उपदेश आहे. समर्थ रामदासांच्या ज्या निवडक रचनांचा महाराष्ट्रीय जनतेवर दीर्घकालपर्यंत ठसा उमटलेला दिसतो त्यात 'मनोबोधा'चा उर्फ 'मनाच्या श्लोकांचा' उल्लेख करणे

अपरिहार्य आहे. महाराष्ट्रातील घराघरातून त्याचप्रमाणे रामदासी पंथातील प्रचार फे-यातून 'मनाच्या श्लोकां' चे एक वेगळे स्थान आहे. 'मनाच्या श्लोकां' मध्ये समर्थ रामदासांनी कर्म, ज्ञान व उपासना यांचा अत्यंत सुलभ व सोप्या भाषेत परंतु परिणामकार रीतीने ओळख करुन दिली आहे.

समर्थ रामदास हे अद्वैत वेदान्ती होते. मानवी मन आणि विश्वमन यात समरुपता आहे, हे समजावून घेण्यासाठी व त्याचा अनुभव घेण्यासाठी देहबुद्धीचा त्याग केला पाहिजे. हे त्यांनी विविध दाखले देऊन सिद्ध केले आहे. त्यांनी मनास सतत उपदेश केला आहे. त्याला आंजारुन, गोंजारुन परमेश्वराची भक्ती करण्यास प्रेरित केले आहे. म्हणून 'मनाच्या श्लोकां' चा स्वतंत्रपणे आणि वैचारिक रितीने अभ्यास होणे गरजेचे आहे.

**समर्थ आणि तुकडोजी महाराज. एक तुलना :**

समाजाला योग्य दिशा दाखविणारे आणि समाजाचे चांगले व्हावे, त्याची उन्नती व्हावी यासाठी आपले सबंध आयुष्य वेचणारे संत हे सर्व काळात, सर्व देशात आणि सर्व धर्मात निर्माण झाल्याचे दिसून येतात. महाराष्ट्रात तर अशा संतांची एक आगळी-वेगळी परंपरा निर्माण झालेली दिसून येते. 13 व्या शतकात ज्ञानाची महती गाणारे संत ज्ञानेश्वर, भक्तिमहात्म्याचे वर्णन करणारे संत नामदेव, पंधराव्या शतकातील रंजल्या-गांजल्या लोकांत देव शोधणारे व महाराच्या पोराला उचलून कडेवर घेणारे संत एकनाथ, तसेच सतराव्या शतकातील संत शिरोमणी तुकाराम महाराज आणि समाजात क्रांतीकारक बदल करणारे रामदास हे वरवर जरी वेगळे वाटले तरी सर्व संतांचे अंतीम ध्येय आणि सिद्धांत समानच असतात. संतांचे कार्य हे त्या वेळच्या परिस्थितीला अनुसरुन समाजाभिमुख असे असते. आणि म्हणूनच संत कोणत्याही काळातील किंवा जाती-धर्मातील असले तरी त्यांचे कार्य सारखेच असते. म्हणजेच संत हे जाती-धर्म-पंथ निरपेक्ष असतात.

समर्थ रामदास हे सतराव्या शतकातील शिवकालीन संत आणि राष्ट्रसंत तुकडोजी हे विसाव्या शतकातील आंग्लकालीन संत आहेत. या दोन्ही संतांच्या काळात तीनशे वर्षाचे अंतर असले तरी दोघांनीही आपल्या काळाला आवश्यक असणारे कार्य करुन समाजाला नीट वळण लावण्याचा, देशाला परकीय राजवटीच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सर्व लोकांना प्रवृत्त करण्याचा केलेला प्रयत्न वैशिष्टयपूर्ण आहे. केवळ भौतिक सुखांनी आणि समृद्धीने समाज हा कधीही सुखी व समाधानी होत नाही, याची स्पष्ट कल्पना या दोन्ही संतांना असल्याने दोघांनीही समाजातील लोकांना अध्यात्माचे महत्व परोपरीने पटवून दिले आहे. याबद्दल समर्थ म्हणतात – "पहिले ते हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्वाविषयी ।। समर्थ

रामदास आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आपापल्या काळातील युगपुरूष होते. [16] एखादा युगपुरूष जेव्हा एखादया काळात जन्म घेतो तेव्हा त्याच्या कार्याने तो काळ उजळून निघतो. समर्थांचा काळ हा यवनी स–तेचा काळ असल्याने त्यावेळच्या समाजात धर्मग्लानी निर्माण झाली होती. रूढी आणि परंपरा यांच्या जोखडाखाली त्यावेळचा समाज चिरडला गेला होता. समाजाला योग्य दिशेने नेण्याचे काम धर्मसंस्थेला निटसे जमत नव्हते. त्यावेळच्या समाजांचे कर्मठपणाचे अवास्तव स्तोम माजले होते व स्वतंत्र्य ही भावनाच मुळ उदासीनता निर्माण करणारी अशी होती.

रामदासांच्या मानाने तुकडोजी महाराजांचा काळ हा बराच वेगळा होता. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य हे दोन्ही जवळून बघितले होते. परकीय स–ता आपल्या देशात असताना लो. टिळक व म. गांधी यांच्या नेतृत्वामुळे स्वातंत्र्य चळवळींना बराच जोर चढला होता. या चळवळीतंकडे लोकांचे दुर्लक्ष व्हावे म्हणून ब्रिटीशांनी हिंदू-मुसलमानांचे दंगे सुरू केले. हा त्यांचा कट ओळखुन तुकडोजी महाराजंनी हिंदु– मुसलमानांत असलेले वैर दूर करण्याचा बराच प्रयत्न केला. त्यांनी लोकांच्या संघटना उभारून त्यांना पारतंत्र्यां विरूध्द लढा देण्यास प्रेरीत केली.

या प्रकारे या दोन्ही संतांनी स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामी अतिशय महत्वपूर्ण कामगिरी पार पाडली आहे. हे दोघेही संत नुसते क्रिर्तन–प्रवचन किंवा पोथीपुराण सांगणारे संत नाहीत. देशाला या दोघांनीही महत्व दिले आहे. त्यांनी देशाची सेवा ही देवाच्या पुजेप्रमाणे केली आहे. त्यांनी एकांतवास न पत्करता लोकांतवास पत्करून त्यावेळच्या समाजजीवनाचे चित्र बदलण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

समर्थांनी रामराज्याचे स्वप्न बघीतले होते. या त्यांच्या राज्यात 'सत्यं–शिवं–सुंदरम्' चा अनुभव प्रतिर्त होत होता. सत्य आणि न्याय याचे सर्वत्र राज्य होते. लोकअतिशय आनंदाचे एकत्रीत रहात होते. हेच रामराज्याचे स्वप्न संत तुकडोजी महाराजांनीही बघितले होते. रामदासाप्रमाणेच संत तुकडोजी महारांनी ग्रामराज्याची उदा–त कल्पना मांडली आहे. सगळयांचे संसार सुखाचे व्हावेत, सर्वांनी चांगलेच बोलावे, जगातील भेद मुळापासून नष्ट व्हावेत, सगळीकडे आनंदी वातावरण निर्माण व्हावे ही त्यांची ग्रामराज्याची कल्पना होती.

समर्थ रामदास आणि संत तुकडोजी महाराज हे दोन वेगवेगळया काळातील त्या त्या काळांचे प्रतिनिधी आहेत. दोघांचेही कार्य महत्वपूर्ण आहे. या दोन्ही संतांचा काळ वेगळा असल्याने दोघांच्याही आचार– विचार आणि कार्य करण्याच्या पध्दतीतही तफावत जाणवते. असे असुनही

समर्थ रामदास आणि संत तुकडोजी महाराज हे इतर सर्व संतांपेक्षा वेगळे संत असुन दोघांचे कार्य हे ब-याच सारख्या प्रकारचे आहे. या दोन्ही संतांनी देशसेवेला अग्रस्थान दिले. देशालाच देव मानुन त्या देशाची आयुष्यभर पूजा केली. वक्तृत्व, सतत प्रयत्नांची पराकष्टा, कडकडीत वैराग्य वृ-ती, निर्भयपणा, प्रसंगानुसार एकांत व लोकांत सेवन करण्याची त्यांची पध्दती आणि प्रभावी व्यक्तिमत्व असे अनेक गुण या दोघांच्याही ठिकाणी असलेले दिसुन येतात. रामदास जसे स्वतःला दास म्हणवून घेत असत, त्याचप्रमाणे 'तुकडयादास' असे तुकडोजी महाराजांनी स्वतःस दास म्हणवून घेतले आहे. समर्थ रामदासांच्या तुलनेत तुकडोजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा मागोवा घेत असता असे जाणवते की अध्यात्मातील तपशीलाच्या विवेचनात समर्थ अधिक सखोल वाटतात. त्याचप्रमाणे सामाजिक कृतीशील प्रयोगाच्या पुरोगामी विचारसरणीच्या बाबतीत महाराज हे समर्थांच्यापेक्षा पुष्कळ पुढे असल्याचे जाणवते. अर्थात समर्थांपेक्षा महाराज तीनशे वर्षे पुढील काळात असल्याने किंवा या वैज्ञानिक युगाचा हा परिणाम असू शकेल.[17] रामदासांचे इतर सर्व संतांहून असणारे वेगळेपण व्यक्त करण्यासाठी सुजाण लोकांनी 'राष्ट्रसंत' उपाधी बहाल केली, तर संत तुकडोजी महाराजांना 'राष्ट्रसंत' ही पदवी देवून गौरव केला.

*************************

# * संदर्भ – सूची *


1. र. रा. गोसावी – 'पाच भक्ति संप्रदाय', प्रथम मुद्रण, मोघे प्रकाशन पुणे कोल्हापूर, मार्च 1974, पान नंबर 215.

2. नि. ना. रेळेकर, हे. वि. इनामदार, नि. धो. मिरजकर संपादीत – श्री नामदेव दर्शन' प्रथम आवृत्ती, नामदेव – समाजोन्नति – परिषद प्रकाशन, कोल्हापूर, 24 नोव्हेंबर 1970, पान नंबर 790.

3. तत्रैव – पान नंबर 791.

4. तत्रैव – पान नंबर 793.

5. तत्रैव – पान नंबर 794.

6. तत्रैव – पा नंबर 798.

7. र. रा. गोसावी – 'पाच भक्तिसंप्रदाय', प्रथम मुद्रण, मोघे प्रकाशन, पुणे कोल्हापूर, मार्च 1974 पान नंबर 106.

8. तत्रैव – पान नंबर 182.

9. तत्रैव – पान नंबर 248

10. तत्रैव – पान नंबर 248.

11. तत्रैव – पान नंबर 248

12. तत्रैव – पान नंबर 248.

13. तत्रैव – पान नंबर 251.

14. वामन वासुदेव गोगटे – 'शिक्षणतज्ञ समर्थ रामदास'

15. राम घोडे – समर्थ रामदास : संत तुकडोजी तौलनिक दर्शन, प्रथम आवृत्ती, 11 ऑक्टोबर 1988, राजीव प्रकाशन, नागपूर, पान नंबर – 24.

16. तत्रैव – पान नंबर 213.


*****